[3 Hours] [Total Marks: 100]

**N.B.** (1) All questions are **compulsory.** Questions **2 to 6** have an **internal choice**
(2) **Figures** to the **right** indicate **full marks**.
(3) Use of simple calculators is **allowed**.
(4)Working notes should **form part** of your answer.

**1(A)** State whether following statements are True or False (Any Ten) **(10)**

1. A Debt Equity Ratio after buyback of shares should be maintained up to 2:1 as per legal requirement.
2. Reduction in Liability is debited to Capital Reduction A/c.
3. Investment Accounting is governed by AS 13.
4. In personal investment accounting, dividend received on shares for pre-acquisition period is treated as revenue gain.
5. Goodwill is classified as Fixed Asset under the Companies Act
6. As per CSR policy it is mandatory for certain companies to spend 5% of their average net profit of three immediately preceding financial years.
7. Law has a legal binding but Ethics do not have a binding nature.
8. Consolidation of shares results in profit for a company.
9. Interest Paid is disclosed under Finance Cost in Profit and Loss A/c.
10. For a company, dividend paid is an expense.
11. Capital Reduction requires court's sanction.
12. Public deposit is secured loan.

**1(B)** Rewrite the following sentences choosing the correct answer (Attempt any 10) **(10)**

1. Bills receivable is shown under ____________________ in Balance Sheet. (Trade Receivables/ Other Current Assets)
2. Internal reconstruction is done as per section_______ of Companies Act (319/ 66)
3. Buyback of equity shares can be of ____________paid up shares. (Fully/ Fully and Partly both)
4. Ex-interest price includes __________only. (Interest/ Cost)
5. The term 'Ethics' comes from ___________word. (Greek/ Latin)
6. Accounting Standard Board is constituted by ____________. (ICWAI/ ICAI)
7. The premium received on sale of Rights is credited to ________________A/c. (Investment/Profit & Loss)
8. A company cannot buy back more than ________of its own funds. (10% / 25%)
9. Reconstruction expenses are _______to Capital Reduction A/c. (Debited/ Credited)

10. The final accounts of companies are to be prepared in accordance with the provisions of _________________ of Companies Act 2013.
    (Schedule III / Schedule IV)
11. Arrears of preference dividend is shown under_____ Liabilities.
    (Current/ Contingent)
12. Current investments are valued at cost or market value whichever is__________.
    (More/ Lower)

**2.** The following is the Balance Sheet of Mayuresh Ltd. as on 31-03-2018:

| Liabilities | ₹ | Assets | ₹. |
|---|---|---|---|
| **Share Capital:** | | **Fixed Assets:** | |
| 8,00,000 Equity Shares of ₹10 | | Land and Buildings | 40,00,000 |
| each fully paid | 80,00,000 | Plant & Machinery | 36,00,000 |
| **Reserves and Surplus:** | | Furniture and Fixtures | 22,00,000 |
| Security Premium | 20,00,000 | **Investments** | 15,00,000 |
| General Reserves | 10,00,000 | **Current Assets, Loans &** | |
| Profit and Loss Account | 50,00,000 | **Advances** | |
| **Secured Loan:** | | Stock | 20,00,000 |
| 10% Debentures | 20,00,000 | Debtors | 40,00,000 |
| **Unsecured Loans** | 20,00,000 | Bills Receivables | 10,00,000 |
| **Current Liabilities &** | | Bank | 47,00,000 |
| **Provisions:** | | | |
| Creditors | 20,00,000 | | |
| Bills Payable | 10,00,000 | | |
| **Total** | **2,30,00,000** | **Total** | **2,30,00,000** |

The Company decides to buy back the maximum number of equity shares as may be permitted by law at a price of ₹20 per share, being the current market price. Investments are sold out at a loss of 20%.
You are required to pass journal entries (without narration) in the books of Mayuresh Ltd assuming that buy back is carried out. Also prepare Notes to Accounts with respect to Reserves and Surplus and Cash and Cash equivalent as on 31st March 2018.
(Do not prepare Balance Sheet) **(15)**

**OR**

**2.** The summarized Balance Sheet of Shalaka Ltd. as on 31-03-2018 is as follows:

| Particulars | ₹ |
|---|---|
| Share Capital: | |
| 6,00,000 Equity shares of ₹10 each fully paid | 60,00,000 |
| Securities Premium | 4,00,000 |
| Profit & Loss Account | 20,00,000 |
| 13% Debentures | 28,00,000 |
| Creditors | 10,00,000 |
| **Total** | **1,22,00,000** |
| | |
| Fixed Assets | 67,00,000 |
| Investments | 25,00,000 |
| Current Assets | 30,00,000 |
| **Total** | **1,22,00,000** |

Ascertain the maximum number of equity shares the company can buy back at the maximum possible price under the law as on 31st March 2018.

Assuming the buyback is actually carried out, record the journal entries (without narration) in the books of Shalaka Ltd. Also prepare Notes to Accounts with respect to Share Capital and Reserves and Surplus as on 31st March 2018. (Do not prepare Balance Sheet) **(15)**

**3.** The following is the trial balance of Rahul Ltd.as on March 31, 2018

| **Particulars** | **Debit (₹)** | **Credit (₹)** |
|---|---|---|
| Stock | 1,25,000 | - |
| Purchases and Sales | 3,45,000 | 4,00,000 |
| Wages | 50,000 | - |
| Discount | 7,000 | 5,000 |
| Salaries | 7,500 | - |
| Rent | 4,950 | - |
| General Expenses | 17,050 | - |
| Surplus Account | - | 15,030 |
| Interim Dividend Paid | 9,000 | - |
| Equity Share Capital : 10,000 Shares of ₹10 each | - | 1,00,000 |
| Debtors and Creditors | 37,500 | 17,500 |
| Machinery | 29,000 | - |
| Cash at Bank | 16,200 | - |
| General Reserve | - | 1,15,500 |
| Bad Debts | 4,830 | - |
| **Total** | **6,53,030** | **6,53,030** |

Additional information:

a) Stock on 31st March, 2018 is valued at ₹3,00,000

b) Purchases include ₹5,000 machinery purchased on 1-10-2017.

c) On 31-3-2018 good worth ₹30,000 were sold to a customer. He has taken away the goods. But no entry is recorded.

d) Directors proposed 10% final dividend (excluding the interim dividend already paid).

e) Provide Income Tax for the year ₹30,000.

f) Transfer ₹20,000 to General Reserve.

Prepare Statement of Profit and Loss and Balance Sheet in vertical format along with notes to Accounts after taking into account the above information. **15)**

**OR**

**3A.** The authorized share capital of a Tarzan Ltd. is ₹1,00,00,000 divided into 50,000 8% preference shares of ₹100 each and 5,00,000 equity shares of ₹10 each. 50% of each class of shares were issued to the public fully called up. ₹20 per share on 1,000 8% preference shares and ₹2 per share on 20,000 equity shares was not received.

The Company's reserves and surplus was as under:

General Reserve (beginning) stood at ₹30,00,000, Profit & Loss Account (beginning) at ₹10,00,000. Profit made during the year was ₹60,00,000. Interim Dividend paid ₹28,00,000. Transfer made to General Reserve was ₹20,00,000. Profit & Loss (year-end) stood at ₹22,00,000.

Prepare the Note on Share Capital and Reserve and Surplus forming part of the Balance Sheet of the Company. **(10)**

**3B.** Z Ltd. has opening balance of ₹20,00,000 in its Machinery Account (WDV). Accumulated depreciation at the beginning was ₹12,00,000. There was an addition of Machinery of ₹10,00,000 at the beginning of the year, while Machinery costing ₹5,00,000 was sold at the end of the year. Accumulated depreciation on Machinery sold at the end of the year was ₹2,62,500

Prepare a note on Fixed Assets forming part of the balance sheet of the company if the depreciation is charged for the year @ 15% on original cost. **(5)**

**4.** Mr. Shivom gives you his following details of investment for the year in 12 % Debentures of ₹100 each in BH Ltd.

| Date | Particulars | Numbers of Debentures | Terms |
|---|---|---|---|
| 01/04/2017 | Balance | 2,000 | Cost Price ₹ 2,02,000 |
| 30/06/2017 | Purchased | 1,000 | ₹103 Cum-Interest |
| 01/09/2017 | Purchased | 1.000 | ₹98 Ex-Interest |
| 01/11/2017 | Sold | 1,200 | ₹102 Cum-Interest |
| 31/12/2017 | Sold | 200 | ₹104 Ex-Interest |
| 01/02/2018 | Purchased | 600 | ₹97 Cum –Interest |
| 01/03/2018 | Sold | 400 | ₹105 Cum-Interest |

Interest is payable half yearly on 30th September and 31st March every year. The Books of accounts are closed on 31st March every year.

Prepare 12% Debenture Account in the books of Mr. Shivom for the year ended on 31st March, 2018. **(15)**

**OR**

**4.** Mr. Jinen had 10,000 equity shares of AP Ltd. on 1st April, 2017. The face value of the share is ₹10 each but book value on 1st April, 2017 was ₹15 per share.

On 1st May, 2017 he purchased another 2,000 equity shares in AP Ltd., at having market price of ₹13 each.

On 1st June, 2017, he purchased additional 3,000 equity shares of the same company at a market price of ₹5 higher than face value.

On 1st July, 2017 he sold 3,000 equity shares at ₹25 per share.

On 1st October, 2017 the directors of AP Ltd. had declared and issued bonus shares at the rate of one share for every four shares held as on that date.

On 1st December, 2017 he purchased 2,000 equity shares of AP Ltd. when market price was ₹20.

On 1st January, 2018, he purchased 3000 right shares in AP Ltd at ₹18 per share.

On 1st February, 2018 he sold 2,500 equity shares for ₹25 per share.

Market Price of shares on 31st March, 2018 was ₹12 per share.

Prepare Equity Shares A/c in Mr. Jinen's books for the year ended 31st March, 2018 **(15)**

**5.** The Following is the Balance Sheet of Aarman Ltd. as on 31st March 2018

| Liabilities | ₹ | Assets | ₹ |
|---|---|---|---|
| 10% Preference Shares of ₹10each | 5,00,000 | Goodwill | 2,00,000 |
| | | Land & Building | 10,00,000 |
| Equity shares of ₹10 each | 10,00,000 | Investments | 5,00,000 |
| 10% Debentures | 2,00,000 | Stock | 4,00,000 |
| Creditors | 2,00,000 | P & L A/c | 4,00,000 |
| Other Liabilities | 7,00,000 | Preliminary expenses | 1,00,000 |
| **Total** | **26,00,000** | **Total** | **26,00,000** |

The scheme of Reconstruction as approved by the court was as under:

1. Each existing equity share will be written down from ₹10 to ₹6 fully paid up.
2. Each 10% Preference Share is to be written down from ₹10 to ₹ 8 fully paid up. These Preference shares are to be converted into 12% Preference Shares of ₹2 each and remaining into Equity shares of ₹ 6 fully paid up.
3. 10% Debenture holders agree to waive 20% of their claims.
4. Assets are revalued as follows:
   Land & Building ₹12,00,000.
   Stock reduced by 20%
5. Creditors are settled as follows:
   a. 30% immediate payment
   b. 20% cancelled
   c. 50% paid by issue of 11% debentures
6. All fictitious and Intangible assets are to be written off.
7. 10,000 Equity Shares of ₹6 each were issued to public for cash, which were fully subscribed

You are required:
Prepare Capital Reduction A/c and show the extract of Asset forming part of balance sheet along with notes to accounts of Aarman Ltd after reconstruction. **(15)**

**OR**

**5.** The Following is the Balance Sheet of Godfrey Ltd.as on 31st March 2018

| Liabilities | ₹ | Assets | ₹ |
|---|---|---|---|
| 5000, 6% Preference Shares of ₹100 each fully paid up | 5,00,000 | Goodwill | 80,000 |
| | | Patents and Trade Marks | 20,000 |
| 40,000 Equity shares of ₹10 each fully paid up | 4,00,000 | Building | 2,15,000 |
| | | Plant & Machinery | 2,55,000 |
| Capital Reserve | 25,000 | Furniture | 60,000 |
| 5% Debentures of ₹100 each | 2,00,000 | Stock | 90,000 |
| Accrued Interest on Debentures | 30,000 | Debtors | 75,000 |
| Creditors | 1,55,000 | Cash at Bank | 12,500 |
| | | Cash in hand | 2,500 |
| | | Profit & Loss A/c | 4,00,000 |
| | | Preliminary Expenses | 1,00,000 |
| **Total** | **13,10,000** | **Total** | **13,10,000** |

Note: The Preference Dividend is in arrears for 3 years
It was decided to reconstruct the Company for which the following scheme was approved by the Court.

1. The assets are to be revalued as follows:

| | |
|---|---|
| Building | ₹2,50,000 |
| Plant & Machinery | ₹2,25,000 |
| Furniture & Fixtures | ₹55,000 |
| Stock | ₹80,000 |
| Debtors | ₹70,000 |

2. Intangible and fictitious assets are to be written of completely.
3. The Preference Shares shall be converted into 7% Preference Share of ₹50 each, number of shares being the same.
4. The Equity Shares shall be reduced to ₹3 each.
5. The 5% Debentures shall be converted into equal number of 6% Debentures of ₹75 each.
6. The Debenture holders also agreed to waive 50% of the accrued interest
7. Arrears of Preference Dividend to be cancelled.
8. The Creditors agreed to waive 30% of their claims and to accept Equity Shares for ₹30,000 in part settlement of their renewed claims.

Draft journal entries (without narration) and give an extract of Balance Sheet to show Shareholders Funds. **(15)**

**6A.** What do you mean by Ethics? Describe its features and scope. **(10)**

**B.** Give disclosure of "Non-Current Investments" of a company as per Schedule III **(10)**

**OR**

**6. Write Short Notes on the following (Any 4)** **(20)**

1. Factors affecting Ethical Behaviour
2. Disclosure of Share Capital in Company Balance Sheet
3. Methods of Internal Reconstruction
4. Benefits of Buy Back
5. Accounting Standard 13
6. Contingent Liabilities

xxxxxxxxxxxxxxxxxxxxx

(मराठी रूपांतर)

[३ तास] [एकूण गुण : १००]

**सूचना :** १. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत. प्र २ ते ६ यांना अंतर्गत पर्याय आहे.
२. उजवीकडील अंक पुर्ण गुण दर्शवितात.
३. साधे गणकयंत्र वापरण्यास परवानगी आहे.
४. तुम्ही केलेली टाचणे उत्तराचा भाग असेल.
५. इंग्रजी भाषेतील मुळ प्रश्न प्रमाण मानावेत.

**१.** अ) खालील विधाने **चूक** की **बरोबर** ते सांगा **(कोणतीही दहा)** **१०**

१. कायदयातील तरतुदीनुसार भाग पुनर्खरेदी नंतर कर्ज स्वनिधी अनुपात २:१ पर्यंत राखला पाहिजे.
२. देयतेमधील कपात ही भांडवल कपात खात्याला नावे टाकली जाते.
३. गुंतवणूक व्यवहार नोंदी ए.एस. १३ प्रमाणे केल्या जातात.
४. वैयक्तिक गुंतवणूक खात्यात, पूर्व अधिग्रहण कालावधीत मिळालेला लाभांश महसुली उत्पन्न म्हणून गणला जातो.
५. प्रमंडळ कायदया नुसार नावलौकिक चे स्थिर मालमत्ता असे वर्गीकरण केले जाते.
६. सी.एस.आर धोरणानुसार काही ठराविक कंपनींना, मागील ३ वर्षाच्या सरासरी निव्वळ नफ्याच्या ५% रक्कम खर्च करणे बंधनकारक आहे.
७. कायदयामध्ये कायदेशीर बंधन असत परंतु नैतिकतेमध्ये असे बंधन नसते.
८. भागांच्या एकत्रीकरणामुळे कंपनीला फायदा होतो.
९. नफा तोटा विवरण पत्रकात दिलेले व्याज हे वित्तिय खर्च या मथळ्याखाली दर्शविले जाते.
१०. दिलेला लाभांश हा कंपनीकरिता खर्च असतो.
११. भांडवल कपातीकरिता न्यायालयाची संमती आवश्यक असते.
१२. सार्वजनिक ठेव हे सुरक्षित कर्ज आहे.

(ब) रिक्त जागा भरुन वाक्य पुन्हा लिहा. **(कोणतेही दहा)** **१०**

१) ताळेबंदामध्ये प्राप्य विपत्र हे _______ या मथळ्याखाली दर्शविले जाते. (व्यापारी प्राप्य/इतर चालू मालमत्ता)
२) प्रमंडळ कायदयाच्या कलम_______ नुसार अंतर्गत पुर्नरचना केली जाते. (३१९/६६)
३) _______ भागांची पुनर्खरेदी करता येऊ शकते. (पूर्णदत्त/पूर्णदत्त व अपूर्णदत्त दोन्ही)
४) व्याजरहित किंमती मध्ये फक्त _______ समाविष्ट असते. (व्याज/खरेदी खर्च)
५) 'इथिक्स' हा शब्द _______ भाषेतील शब्दापासून आला आहे. (ग्रीक/लॅटिन)
६) ए एस् बी (ASB) ची स्थापना _______ कडून केली जाते. (आय सी डब्ल्यू ए आय/आय सी ए आय)
७) हक्क भागाच्या विक्रिवरील अधिभार हा _______ खात्याला जमा केला जातो. (गुंतवणूक/नफा तोटा)
८) कंपनी स्वनिधीच्या _______ टक्के पेक्षा जास्त भाग पुनर्खरेदी करु शकत नाही. (१०/२५)
९) पुर्नरचनेचा खर्च हा भांडवल कपात खात्याला _______ केला जातो. (नावे/जमा)

**54154**



6CEE31F3FCD164F5E3F8F7AC70C9A44C

१०) कंपनीचे वार्षिक विवरण पत्र हे प्रमंडळ कायदा २०१३ च्या _______ मधील तरतुदीनुसार बनविले जाते (परिशिष्ट ३/परिशिष्ट ४)

११) अग्रहक्क भागावरील लाभांश बाकी ही _______ देयता मथळ्याखाली दर्शविली जाते. (चालू/संभाव्य)

१२) चालू गुंतवणुकीची गणना खरेदी किंमत किंवा बाजारी मूल्य यापैकी जी _______ असेल, त्यानुसार केली जाते. (जास्त /कमी)

२. ३१.०३.२०१८ रोजीचा मयुरेश लि. चा ताळेबंद पुढीलप्रमाणे आहे. १५

| देणी | ₹ | मालमत्ता | ₹ |
|---|---|---|---|
| **भाग भांडवलः** | | **स्थिर संपत्तीः** | |
| ८,००,००० समभाग प्रत्येकी १० रु चे | | जमीन आणि इमारत | ४०,००,००० |
| पूर्ण दत्त | ८०,००,००० | संयत्र आणि यंत्र | ३६,००,००० |
| **निधी आणि अधिक्यः** | | फर्निचर | २२,००,००० |
| भाग अधिभार | २०,००,००० | गुंतवणूक | १५,००,००० |
| सामान्य निधी | १०,००,००० | **चालू मालमत्ताः** | |
| नफा तोटा खाते | ५०,००,००० | मालसाठा | २०,००,००० |
| **सुरक्षित कर्जः** | | ऋणको | ४०,००,००० |
| १०% कर्जरोखे | २०,००,००० | प्राप्य प्रपत्र | १०,००,००० |
| | | अधिकोष शिल्लक | ४७,००,००० |
| असुरक्षित कर्ज | २०,००,००० | | |
| चालू देयता व तरतूद | | | |
| धनको | २०,००,००० | | |
| देय प्रपत्र | १०,००,००० | | |
| **एकूण** | **२,३०,००,०००** | **एकूण** | **२,३०,००,०००** |

कंपनीने कायदेशीर तरतुदीनुसार रु २० या प्रति मूल्याने अधिकाधिक भाग पुनर्खरेदी करण्याचे ठरविले. गुंतवणूक २०% तोटा सहन करुन विकण्यात आली.

भाग पुनर्खरेदी केल्याचे गृहित धरुन मयुरेश लि.च्या पुस्तकात नोंदी करा. त्याच बरोबर निधी आणि अधिक्याची तसेच रोख व रोखसमकक्ष याची टिप्पणी तयार करा. (ताळेबंद बनवू नये)

**किंवा**

२. ३१.०३.२०१८ रोजीचा शलाका लि. चा सारांश ताळेबंद पुढील प्रमाणे आहे. १५

| तपशील | ₹ |
|---|---|
| भाग भांडवलः | |
| ६,००,००० समभाग प्रत्येकी रु १० चे पुर्ण दत्त | ६०,००,००० |
| भाग अधिभार | ४,००,००० |
| नफा तोटा खाते | २०,००,००० |
| १३% कर्जरोखे | २८,००,००० |
| धनको | १०,००,००० |
| **एकूण** | **१,२२,००,०००** |
| स्थिर संपत्ति | ६७,००,००० |

54154



6CEE31F3FCD164F5E3F8F7AC70C9A44C

| | |
|---|---|
| गुंतवणूक | २५,००,००० |
| चालू मालमत्ता | ३०,००,००० |
| **एकूण** | **१,२२,००,०००** |

कायदेशीर तरतुदीनुसार कंपनी अधिकाधिक मूल्याने किती अधिकाधिक भाग पुनर्खरेदी करु शकते, ते काढा. भाग पुनर्खरेदी झाल्याचे गृहित धरुन शलाका लि. च्या पुस्तकात नोंदी करा. तसेच ३१ मार्च २०१८ रोजीच्या भाग भांडवल आणि निधि व अधिक्य च्या टिप्पणी तयार करा.

**३.** ३१ मार्च २०१८ रोजीचे राहुल लि. चे तेरीजपत्रक पुढील प्रमाणे आहे. **१५**

| तपशील | नावे (₹) | जमा (₹) |
|---|---|---|
| मालसाठा | १,२५,००० | – |
| खरेदी आणि विक्री | ३,४५,००० | ४,००,००० |
| मजुरी | ५०,००० | – |
| सूट | ७,००० | ५,००० |
| वेतन | ७,५०० | – |
| भाडे | ४,९५० | – |
| सामान्य खर्च | १७,०५० | – |
| अधिक्य खाते | – | १५,०३० |
| अंतरिम लाभांश | ९,००० | – |
| समभाग भांडवलः १०,००० भाग प्रत्येकी १० रु चे | – | १,००,००० |
| ऋणको आणि धनको | ३७,५०० | १७,५०० |
| यंत्र | २९,००० | – |
| अधिकोष शिल्लक | १६,२०० | – |
| सामान्य निधी | – | १,१५,५०० |
| बुडित कर्ज | ४,८३० | – |
| **एकूण** | **६,५३,०३०** | **६,५३,०३०** |

अधिक माहितीः

अ) ३१ मार्च २०१८ रोजीचा मालसाठा ₹ ३,००,०००

ब) खरेदी मध्ये १-१०-२०१७ रोजी खरेदी केलेल्या ₹ ५,००० किंमतीच्या यंत्राची खरेदी समाविष्ट आहे.

क) ३१-०३-२०१८ रोजी ग्राहकाला ₹ ३०,००० किंमतीचा माल विकण्यात आला. त्याने मालाचा ताबा घेतला आहे. परंतु पुस्तकात मात्र याची नोंद करण्यात आलेली नाही.

ड) अंतरिम लाभांश वगळता संचालकांनी १० टक्के अंतिम लाभांश जाहिर केला.

इ) चालू आर्थिक वर्षाकरिता ₹ ३०,००० कर तरतूद करा.

फ) ₹ २०,००० समान्य निधिला वर्ग करा.

**किंवा**

**३.** अ) टारझन लि. चे अधिकृत भाग भांडवल ₹ १,००,००,००० असून ते ५०,००० ८% अग्रहक्क भाग प्रत्येकी ₹ १०० चे आणि ५,००,००० समभाग प्रत्येकी ₹ १० चे असे विभागले गेले आहे. दोन्ही प्रकारच्या भागांपैकी ५० टक्के भागांची विक्री करण्यात आली असून त्यावर पूर्ण रक्कमेची मागणी करण्यात आली आहे. परंतु ८% अग्रहक्क भागांपैकी १,००० भागावर प्रत्येकी ₹ २० आणि समभागांपैकी २०,००० भागांवर प्रत्येकी ₹ २ ची रक्कम प्राप्त झालेली नाही. कंपनीचे निधी व अधिक्य खालीलप्रमाणेः **१०**

**54154**

सामान्य निधी (सुरुवातीचे) ₹ ३०,००,०००
नफातोटा खाते (सुरुवातीचे) ₹ १०,००,०००
चालू वर्षातील कमवलेला नफा ₹ ६०,००,०००
अंतरिम लाभांश ₹ २८,००,०००
सामान्य निधिला वर्ग करण्यात आलेली रक्कम ₹ २०,००,०००
नफा तोटा खाते (वर्ष अखेर) ₹ २२,००,०००

कंपनीच्या ताळेबंदाचा भाग म्हणून भाग भांडवल आणि निधि व अधिक्य यांची टिप्पणी तयार करा.

ब) झेड लि. च्या यंत्र खात्यात सुरुवातीची शिल्लक ₹ २०,००,००० (घसारित मूल्य) व सुरुवातीचा संचित घसारा ₹ १२,००,००० होता. वर्षाच्या सुरुवातीला ₹ १०,००,००० किंमतीच्या यंत्राची वाढीव खरेदी केली होती. व वर्षाच्या शेवटी ₹ ५,००,००० खरेदी किंमत असलेल्या यंत्राची विक्री करण्यात आली होती वर्षाअखेर विक्री केलेल्या यंत्रावरील संचित घसारा ₹ २,६२,५०० इतका होता. ०५

मूळ खरेदी किंमतीवर १५ टक्के दराने घसारा आकारुन स्थिर मालमत्तेची टिप्पणी तयार करा.

४. बी एच लि. च्या प्रत्येकी १०० ₹ १२ टक्के कर्जरोख्या मधील गुंतवणुकीबाबत श्री शिवोम यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे. १५

| दिनांक | तपशील | कर्जरोखे संख्या | |
|---|---|---|---|
| ०१-०४/२०१७ | शिल्लक | २,००० | खरेदी किंमत ₹ २,०२,००० |
| ३०/०६/२०१७ | खरेदी | १,००० | ₹ १०३ व्याजासहित |
| ०१/०९/२०१७ | खरेदी | १,००० | ₹ ९८ व्याजरहित |
| ०१/११/२०१७ | विक्री | १,२०० | ₹ १०२ व्याजासहित |
| ३१/१२/२०१७ | विक्री | २०० | ₹ १०४ व्याजरहित |
| ०१/०२/२०१८ | खरेदी | ६०० | ₹ ९७ व्याजसहित |
| ०१/०३/२०१८ | विक्री | ४०० | ₹ १०५ व्याजसहित |

दरवर्षी ३० सप्टेंबर आणि ३१ मार्च रोजी व्याज देय असते. खाते पुस्तक दरवर्षी ३१ मार्च ला बंद केले जाते. श्री शिवोम यांच्या पुस्तकात ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता १२% कर्जरोखे खाते तयार करा.

**किंवा**

४. १ एप्रिल २०१७ रोजी श्री जिनेन यांच्याकडे एपी लि. चे १०,००० समभाग होते. भागाचे दर्शनी मूल्य ₹ १० प्रत्येकी होते परंतु १ एप्रिल २०१७ रोजी त्यांचे पुस्तकी मूल्य ₹ १५ प्रत्येकी होते. १५

१ मे २०१७ रोजी एपी लि. चे २,००० समभाग बाजारी मूल्य प्रत्येकी ₹ १३ प्रमाणे खरेदी केले.

१ जून २०१७ रोजी त्याच कंपनीचे वाढीव ३,००० समभाग दर्शनी मूल्यापेक्षा ५ रु ने जास्त असलेल्या बाजारी मूल्याप्रमाणे खरेदी केले.

१ जुलै २०१७ रोजी त्यांनी ३,००० समभाग प्रत्येकी ₹ २५ दराने विकले.

१ ऑक्टोबर २०१७ रोजी, एपी लि. च्या संचालकांनी त्या दिवशी असलेल्या प्रत्येक ४ भागांकरिता १ भाग या प्रमाणे बोनस भाग निर्गमित केले.

१ डिसेंबर २०१७ रोजी त्यांनी एपी लि. चे २,००० समभाग खरेदी केले जेव्हा त्यांचे बाजारी मूल्य होते प्रत्येकी रु २०

१ जानेवारी २०१८ रोजी जिनेन यांनी एपी लि चे ३,००० हक्कभाग प्रत्येकी ₹ १८ प्रमाणे खरेदी केले.

१ फेब्रुवारी २०१८ रोजी २,५०० समभाग प्रत्येकी ₹ २५ विक्री कराण्यात आले.

दि. ३१ मार्च २०१८ रोजी भागांचे बाजारी मूल्य प्रत्येकी रु १२ होते दि. ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता श्री जिनेन यांच्या पुस्तकात समभाग खाते तयार करा.

५. ३१ मार्च २०१८ रोजी अरमान लि. चा ताळेबंद पुढील प्रमाणे आहे. १५

| **देयता** | ₹ | **मालमत्ता** | ₹ |
|---|---|---|---|
| १०% अग्रहक्क भाग | | नावलौकिक | २,००,००० |
| प्रत्येकी ₹ १० चे | ५,००,००० | जमीन व इमारत | १०,००,००० |
| समभाग प्रत्येकी रु | | गुंतवणूक | ५,००,००० |
| १० चे | १०,००,००० | मालसाठा | ४,००,००० |
| १०% कर्जरोखे | २,००,००० | नफा तोटा खाते | ४,००,००० |
| धनको | २,००,००० | प्राथमिक खर्च | १,००,००० |
| इतर देयता | ७,००,००० | | |
| **एकूण** | **२६,००,०००** | **एकूण** | **२६,००,०००** |

न्यायालयाने मंजूर केलेली पुर्नरचनेची योजना खालीलप्रमाणेः

१) प्रत्येक समभागाचे मूल्य ₹ १० वरुन ₹ ६ पूर्णदत्त पर्यंत कमी करावे.

२) प्रत्येक १०% अग्रहक्क भागाचे मूल्य ₹ १० वरुन ₹ ८ पूर्णदत्त पर्यंत कमी करावे या अग्रहक्क भागांचे रुपांतर प्रत्येकी ₹ २ चे १२% अग्रहक्क भाग व प्रत्येकी ₹ ६ पूर्ण दत्त समभाग असे करण्यात आले.

३) १०% कर्जरोखे धारकांनी २०% रक्कम सोडून देण्याचे मान्य केले.

४) संपत्तीचे पुनर्मुल्यांकन खालीलप्रमाणे करण्यात आले.
जमीन व इमारत ₹ १२,००,०००
मालसाठा २०% ने कमी

५) धनको चा हिशोब पुढीलप्रमाणे करण्यात आलाः
३०% त्वरित देण्यात आले.
२०% सोडून देण्यात आले.
५०% करिता ११% कर्जरोखे देण्यात आले.

६) अचल संपत्ती व नफा तोटा खाते विकलन बाद करण्यात यावे.

७) प्रत्येकी ₹ ६ चे १०,००० समभाग रोखीकरिता निर्गमित करण्यात आले व ते पूर्ण वसूल झाले.

भांडवल कपात खाते तयार करा आणि ताळेबंद मधील मालमत्ता भाग त्यांच्या टिप्पणीसह प्रदर्शित करा.

**किंवा**

५. ३१ मार्च २०१८ रोजीचा गॉडफ्रे लि. चा ताळेबंद पुढीलप्रमाणे आहे. १५

| **देणी** | ₹ | **मालमत्ता** | ₹ |
|---|---|---|---|
| ५,००० ६% अग्रहक्क | | नावलौकिक | ८०,००० |
| भाग प्रत्येक ₹ १०० चे पूर्ण दत्त | ५,००,००० | पेटंट व ट्रेडमार्क | २०,००० |
| ४०,००० समभाग प्रत्येकी ₹ १० चे | | इमारत | २,१५,००० |
| पूर्णदत्त | ४,००,००० | यंत्र व संयंत्र | २,५५,००० |
| भांडवल निधी | २५,००० | फर्निचर | ६०,००० |
| ५% कर्जरोखे प्रत्येकी ₹ १०० चे | २,००,००० | मालसाठा | ९०,००० |
| कर्जरोखे वरील देय व्याज | ३०,००० | ऋणको | ७५,००० |
| धनको | १,५५,००० | अधिकोषातील शिल्लक | १२,५०० |

54154



6CEE31F3FCD164F5E3F8F7AC70C9A44C

| | | | |
|---|---|---|---|
| | | हुस्तस्थ रोख<br>नफा तोटा खाते<br>प्राथमिक खर्च | २,५००<br>४,००,०००<br>१,००,००० |
| **एकूण** | **१३,१०,०००** | **एकूण** | **१३,१०,०००** |

टिपः अग्रहक्क भागावरील लाभांश ३ वर्षाकरिता बाकी.

कंपनीची पुर्नरचना करण्याचे ठरविण्यात आले त्याकरिता न्यायालयाने मंजूर केलेली, योजना पुढीलप्रमाणेः

१) संपत्तिचे पुनर्मुल्यांकन पुढीलप्रमाणे करण्यात यावेः

| | |
|---|---|
| इमारत | ₹ २,५०,००० |
| यंत्र व संयंत्र | ₹ २,२५,००० |
| फर्निचर | ₹ ५५,००० |
| मालसाठा | ₹ ८०,००० |
| ऋणको | ₹ ७०,००० |

२) अचल संपत्ति व नफा तोटा विकलन पूर्णपणे बाद करण्यात यावे.

३) अग्रहक्क भागाचे रुपांतर तितक्याच संख्येच्या ७% अग्रहक्क भाग प्रत्येकी ₹ ५० मध्ये करण्यात यावे.

४) समभागाचे मूल्य प्रत्येकी ₹ ३ पर्यंत कमी करण्यात यावे.

५) ५% कर्जरोखे चे रुपांतर तितक्याच ६% कर्जरोखे प्रत्येकी ₹ ७५ मध्ये करण्यात यावे.

६) कर्जरोखे धारकांनी येणे व्याजाच्या ५०% रक्कम सोडून देण्याचे मान्य केले.

७) अग्रहक्क भागांवरील लाभांश बाकी रद्द करण्यात यावी.

८) धनकोंनी त्यांच्या देयते पैकी ३०% रक्कम सोडून देण्याचे मान्य केले. व नविन देयतेपैकी रु ३०,००० साठी समभाग स्विकारले.

वरील माहितीवरुन पुस्तकात नोंदी करा (वर्णनाशिवाय) आणि ताळेबंद मधील भागधारक निधी चा भाग प्रदर्शित करा.

**६.** (अ) 'नैतिकता' म्हणजे काय? तिच्या वैशिष्ट्यांचे व व्याप्ती चे वर्णन करा. **१०**

(ब) परिशिष्ट ३ प्रमाणे प्रमंडळाच्या 'दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीचे' प्रगटीकरण करा. **१०**

**किंवा**

**६.** खालीलपैकी **कोणत्याही** ४ वर टीपा लिहा. **२०**

१. नैतिक वर्तनावर परिणाम करणारे घटक
२. प्रमंडळाच्या ताळेबंदामधील भाग भांडवलाचे प्रगटीकरण
३. अंतर्गत पुनर्रचनेच्या पध्दती
४. भाग पुनर्खरेदीचे फायदे
५. लेखा दंडक १३
६. संभाव्य देयता

--------------------------------

**54154**



6CEE31F3FCD164F5E3F8F7AC70C9A44C